महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष सहावे ■ अंक १ ला ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ ऑक्टोबर २०१५ पाने–१४

## संपादकीय

### पक्ष्यांचा नैसर्गिक हक्क

काही दिवसांपूर्वी नागपूरहून एका गृहस्थाचा फोन आला होता. आपल्या वेबसाइटवर त्यांना हा नंबर मिळाला होता. काही दिवसांपूर्वी एक जखमी पोपट त्यांच्या घरात आला होता. त्यांनी औषधोपचार केल्यावर तो बरा झाला. त्यानंतरही तो त्यांच्या घरात मुक्तपणे राहत होता. त्यांना त्याचा खूप लळा लागला होता. पण एक दिवस तो उडून गेला. त्याच्या विरहाने ते खूपच खंतावले. बाजारातून त्यांनी दोन पोपट असलेला पिंजरा विकत आणला. त्यांच्या दर्शनातून ते सोडून गेलेल्या पोपटाला पाहत होते. मात्र काही दिवसांनी त्यांना पिंजऱ्यात ठेवण्यात आलेल्या पोपटांना पाहून आपण त्यांच्यावर अन्याय तर करीत नाही ना, अशी टोचणी वाटू लागली. ही टोचणी त्यांना सतावत राहिली व त्यातूनच त्यांनी फोन करून 'आता काय करू ?' अशी पृच्छा केली होती. त्याचबरोबर बंदिवान पोपटांना मुक्त केले तर त्यांना बाहेर धोका तर होणार नाही, अशी धास्ती वाटत होती.

मी त्यांना म्हणालो, 'असं करा, तुम्ही पिंजऱ्याचं दार उघडं ठेवा. त्यांना असं वाटलं की ते बाहेर झेप घ्यायला समर्थ आहेत की ते उडून जातील. त्यांना काही होणार नाही.'

थोडक्यात, सहृदय माणसाला पक्ष्याला बंदिवान करून ठेवलेसे रुचत नाही. पण त्याकडे करमणुकीची वस्तू म्हणून बघणाऱ्याला तसे करण्यात आपण काही अन्याय करतो आहोत, निसर्गात ढवळाढवळ करीत आहोत, असे वाटत नाही.

पक्ष्याला मुक्तावस्थेत राहू द्या. तो तसा राहण्यासाठी निसर्ग रक्षणावर भर द्या, हेच तर 'पक्षी मित्र' सांगत असतो.

**– दिगंबर गाडगीळ**

३९, आनंदवन कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३)२५७७९६८, चलभाष : ९८८१०७९७११, E-mail : dgadgil09@gmail.com

**पक्षीमित्रच्या संदर्भातील पत्रव्यवहार, लेख संपादकांकडे पाठवावा. प्रशासकीय बाबींबद्दल मात्र चिपळूणच्या पत्त्यावर लिहावे.**

---

## अध्यक्षीय

BNHS, IBCN यांनी पुरस्कृत केलेला पक्षीमित्राचा हा शेवटचा अंक आहे. त्यांनी एक वर्ष अंक पुरस्कृत केला. त्यामुळे आपण वर्षभरातील चार अंक अधिक मोठ्या आकारात काढू शकलो. धन्यवाद !!

१९९८ साली IBCN ने चालू केलेल्या IBCN या नेटवर्कचे पक्षी संरक्षण व संवर्धन क्षेत्रात मोठे योगदान आहे.

त्याची वार्षिक सभासद वर्गणी फक्त ₹ १५०/– आहे. ज्यांना शक्य आहे, त्यांनी अवश्य सभासद व्हा. त्यांच्या सभासदांसाठी मोफत येणाऱ्या अंकातून मोलाची माहिती मिळत असते.

जिल्ह्यामध्ये 'पक्षीमित्र'चे काम करू इच्छिणाऱ्या सभासदांना निमंत्रित सभासद करून घेण्यात येणार आहे. गेल्या अंकातील आवाहनाला एक दोनच जणांनी प्रतिसाद दिला. 'पक्षीमित्र'चे काम वाढविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातून निदान एक सभासद पुढे येणे अपेक्षित आहे. कृपया अजूनही याबाबत नावे कळवा, जेणेकरून पक्षीमित्राचे काम संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचेल.

**– भाऊ काटदरे**

९३७३६१०८१७

**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोहचवा, ते सभासद होतील !**

# लार्क (चंडोल)

गवताळ माळरानावर सापडणाऱ्या लहान पक्ष्यांमध्ये लार्क, पिपीट् या पक्ष्यांचा प्रामुख्याने समावेश असतो. पक्षीनिरीक्षणादरम्यान बरेचदा स्थलातंरित पक्षी, पाणपक्षी, आकर्षक पक्षी आपले लक्ष वेधून घेत असतात. अनेक पक्षीनिरीक्षकांचे या छोट्या व कमी आकर्षक असलेल्या प्रजातींकडे लक्षसुद्धा जात नाही. तसेच या प्रजाती व त्यातील उपजाती ओळखणेसुद्धा जिकीरीचे काम असल्याने असे पक्षी नेहमीच दुर्लक्षित राहतात. मराठीमध्ये ज्याला 'चंडोल' म्हटले जाते तो म्हणजे 'लार्क' पक्षी. गतवर्षीच्या हिवाळ्यादरम्यान या लार्कची छायाचित्रे घेत असताना त्यांच्यामध्ये वेगवेगळ्या प्रजाती दिसून आल्या. मग आम्ही वेक्स चे (अमरावती) पक्षी अभ्यासक लार्कच्या पाठीमागे लागलो.

लार्क अर्थात् चंडोल पक्षी माळरानावर, गवती कुरणांमध्ये किंवा पीक कापलेल्या शेतामध्ये आढळणारी पक्षी प्रजाती आहे. लार्क या पक्ष्याचा रंग साधारणत: तांबूस रंगाचा असतो. भारतीय उपखंडामध्ये एकूण २२ प्रकारच्या लार्क प्रजाती आढळत असून त्यांपैकी ९ प्रजातीची नोंदी विदर्भामध्ये आहे. या ९ प्रजातींपैकी ८ प्रजाती Singing Bushlark (Mirafra cantllans), Indian Bushlark (Mirafra erythroptpera), Ashy-crowned sparrow lark (Eremopterix grisea), Rufous-tailed lark (Ammomanes phoenicurus), Crested Lark (Galeride cristata), Malabar Lark (Galeriba malabarica), Sykes's Lark (Galerida deva), Oriental skylark (Alaudea gulgula) या स्थानिक रहिवासी असून फक्त एक प्रजाती हिवाळ्या दरम्यान स्थलांतर करून येणारी आहे. मात्र या साऱ्या वेगवेगळ्या प्रजातींची ओळख पटविणे, त्यांच्यातील फरकांचे निरीक्षण नोंदविणे, त्यांचा आवाज, त्यांच्या हालचाली अभ्यासणे हे आव्हानात्मक व मजेशीर असे काम आहे, जे आम्ही गेल्या वर्षभर केले. विदर्भातील अमरावती, अकोला, नागपूर, वर्धा इत्यादी जिल्ह्यांमध्ये मी, निनाद, अभंग, शिशीर शेंडोकार व डॉ. जयंत वडतकर या वेक्सच्या पक्षी अभ्यासकांनी लार्कचा मागोवा घेत काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदविली आहेत.

विदर्भामध्ये सर्वसाधारणपणे सर्वत्र आढळणारी लार्कची प्रजाती म्हणजे Indian Bush Lark. परंतु पक्षी निरीक्षकाच्या नोंदीमध्ये मात्र लिहिला जातो तो Singing Bush Lark. या प्रजातीच्या प्रजनन काळामध्ये केले जाणारे नृत्य (Display) म्हणजे हवेतील कसरती असतात. या कसरती दोन्ही प्रजातींमध्ये जवळपास सारख्या असतात. आवाजातही बरेचसे साम्य असून दिसण्यात असणाऱ्या सारखेपणामुळे यांची ओळख पटविताना Singing Bush lark ही माहितीतील प्रजाती असल्याने तिचीच नोंद घेतली जाते. इतर स्थानिक लार्क प्रजातींमध्ये विदर्भात सामान्यपणे आढळणाऱ्या प्रजाती म्हणजे Ashy-Crown Sparrow Lark, Rufous- tailed Lark व Sykes Lark यांचा विस्तार विदर्भामध्ये सर्वदूर आढळतो. Crested Lark, Oriental sky lark, Malabar lark या तीन प्रजाती विदर्भात आढळत असल्या तरी त्या क्वचितच दिसतात. Greater Short-toed Lark (Calandrella brachydactyla) ही प्रजाती मूळची दक्षिण युरोप व




उत्तर आफ्रिकेतील रहिवासी आहे.

मुख्यत: अमरावतीमधील चार तलावांवर त्यांची हजेरी ऑक्टोबर ते एप्रिल पर्यंत होते. नारायणपूर तलावावर ऑक्टोबरच्या सुरुवातीला ४२ चा थवा दिसून आला. १५ दिवसांनी त्यांची संख्या १०० च्या वर पोहोचली तर नोव्हेंबर महिन्यात सावर्डी तलावावर हा थवा ३०० पर्यंत पोहोचला. तलावावरील मोकळ्या मैदानात गवतातील बिया टिपण्याचे त्यांचे काम चालू असायचे. जमिनीशी व खुरट्या गवताशी त्या अशा काही एकरूप होऊन जात की, जवळ जाऊन पाहिल्याशिवाय त्या दिसत नव्हत्या. थोडी जरी चाहूल लागली की, पूर्ण थवा उडायला लागतो. उडताना आकाशात एवढी त्यांची संख्या असते की, जणू काही काळे छोटे ढगच! तलावाच्या भोवताली पाच ते दहा मिनिटं फेरी मारून पुन्हा त्याच ठिकाणी थवा उतरतो.

आकाराने चिमणी एवढ्या असणाऱ्या या लार्कचा वरील भाग तांबूस रंगाचा असतो. डोक्यावर पिवळसर पिंगट रंग व काळ्या रेषा असतात, छातीचा खालचा भाग तांबूस पिवळट असतो. बोटाचे मागील नख, आखूड तसेच चोच छोटी, साधारणत: ढोबळ मानाने असे वर्णन Greater Short - toed Lark ला ओळखण्यासाठी केले जाते. जेव्हा आम्ही या थव्यांचे निरीक्षण केले तेव्हा त्यात काही लार्क वेगळे वाटले. काहींचा आकार थोडा मोठा तर काहींचा लहान आढळला. काही लार्क गर्द विटकरी रंगाचे भुवई जाड व पांढऱ्या रंगाची, छातीवर वरील बाजूस गळ्याखाली ठळकपणे दिसणारी काळ्या रंगाची पट्टी व चोच थोडी गुलाबी रंगाची व मोठी होती. काही लार्क पांढुरक्या रंगाच्या होत्या. छातीचा व पोटाचा भाग पूर्णपणे पांढुरक्या रंगाचा दिसला व मुख्यत: चोच ही आणखी छोटी आढळली.

यावरून या दोन प्रकारच्या उपजाती आहेत, हे स्पष्ट होते. पामेला रासमुसेन व ग्रिमेट यांच्या भारतीय पक्ष्यांवरील संदर्भ पुस्तकाप्रमाणे Greater Short - toed Lark च्या Longipennis आणि Dukhunesis अशा दोन उपजाती आहेत. याचा अर्थ आम्ही जो लार्क गर्द विटकरी रंगाचा पाहिली तो Dukhunesis आणि जी पांढुरक्या रंगाची पाहिली ती Longipennis होती. पामेला रासमुसेन यांच्या संदर्भाप्रमाणे

पान ३ वर...

पान २ वरून...




Longipennis ची लांबी, डोक्याचे आकारमान, शेपटीची लांबी हे Dukhunesis पेक्षा मोठे असते. तसेच दोघांचा आवाजही वेगवेगळा आहे. Longipennis चा आवाज ट्रिप-ट्रिप-ट्रिप-ट्रिप.. ट्रि-ट्रि असा तुटकसा असतो. तर Dukhunesis चा आवाज डु-डु-डु-डु आणि टु-टु-टु-टु असा जोराने सलगपणे येतो. हे दोन्ही आवाज ऐकण्याचा अनुभव आम्हाला थव्याचे निरीक्षण करताना आला.

यावरूनच या दोन्ही उपजाती आम्ही एकत्र थव्यामध्ये पहिल्या पण पामेला रासमुसेन यांच्या संदर्भानुसार दोन्ही उपजाती भारतीय उपखंडात वेगवेगळ्या ठिकाणी हिवाळी स्थलांतर करतात. Longipennis ही भारताचा उत्तर-पश्चिम भाग, गुजरात, पाकिस्तान या भागात तर Dukhunesis ही दख्खनचे पठार आणि दक्षिण भारत, कर्नाटक अशा वेगळ्या ठिकाणी यांचे स्थलांतर दाखविते आहे. पण विदर्भातील आमच्या निरीक्षणावरून दोन्ही उपजाती या एकत्र रहातात किंवा स्थलांतराचा काळ एकत्र घालवितात, हे स्पष्ट होते. ऑक्टोबर ते एप्रिल अशा सात महिन्यात Greater Short-toed Lark केवळ तलावाच्या आजूबाजूलाच आढळल्या. एप्रिलच्या अखेरीस अमरावतीवरील तलावावर यांच्या थव्याची संख्या ४०० च्या वर पोहोचली होती. म्हणजेच मायदेशी स्थलांतर करून जाण्यास त्यांचे एकत्रीकरण होणे चालू असावे. यावर्षीच्या निरीक्षणावरून एवढी माहिती गोळा करता आली. पुढील हिवाळ्यात Greater Shor-toed Lark चे स्थलांतर सुरू झाल्यावर त्यांचे अजून बारकाईने निरीक्षण व पाठपुरावा करण्यास आम्ही वेक्सचे पक्षी अभ्यासक आतुर असू. कदाचित अजून काही नवी माहिती आम्हाला गवसेल.

**– किरण मोरे**

*वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्था, अमरावती*

*e-mail: kiranmorey1983@gmail.com*

# वेडा राघूची सुटका

दि. ९ जानेवारी २०१५ वेळ सकाळी ९.३०. अहमदनगर शहरामधील नवलेनगर भागातील माझे मित्र श्री. अनिल नवले यांचा भ्रमणध्वनी आला. त्यांनी सांगितले की, त्यांचे घरातील वरच्या मजल्यावरील खोलीत एक पक्षी आलेला आहे आणि खिडक्या उघड्या असूनही तो बाहेर जात नाही. त्यांच्या निरोपानुसार मी त्यांच्या घरी जाऊन खोलीत जाऊन पाहिले. खोलीत एक वेडा राघू (Green Bee Eater) पंख्याच्या (छतावरील) पात्यावर बसलेला दिसला. त्याला पकडण्याचा प्रयत्न करताना तो खोलीत चकरा मारून पुन्हा पंख्याच्या पातीवरच बसत होता. दारे-खिडक्या उघड्या असूनही बाहेर जायचा प्रयत्न करीत नव्हता. थोड्या वेळाने वेडा राघू पंख्याच्या पातीवर स्थिर बसल्यावर पातीवरच एक नॅपकीन त्याच्या अंगावर टाकून त्याला हातात घेतले. डोक्यावर थोडी कोरडी जखम दिसली, मात्र तो सावध आणि स्वस्थ दिसला. त्याला बाहेर अंगणात नेऊन माथ्यावर थोडी हळद पावडर टाकून घरासमोरील झाडावर फांदीवर ठेवण्याचा प्रयत्न केला. पण तो फांदीवर बसेना. मग मी त्याला डाव्या हाताच्या तळव्यावर मोकळा ठेवला. लगेच झेप घेत समोरील तारेवर जाऊन बसला. नंतर दिसेनासा झाला. वेडा राघू हा पक्षी हवेतच उंचावर उडणारा असल्याने घराच्या दार आणि खिडकीमधून बाहेर गेला नाही. पक्षीमित्र या नात्याने अनेक मित्र जोडले जातात आणि पक्ष्यांविषयी सहानुभूती निर्माण होते.

**– बाळासाहेब कुलकर्णी.**

*अ.नगर*

# ...आणि आता राज्यफुलपाखरू



महाराष्ट्राचा राज्यपक्षी – हरियाल, राज्यप्राणी – शेकरू, राज्यवृक्ष – आंबा आणि राज्यफुल– जारुल आपणांस परिचित आहेत. आता ब्ल्यू मॉरमॉनला राज्य फुलपाखराचा दर्जा देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य वन्यजाती मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्य फुलपाखरू घोषित करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.


निसर्गात फुलपाखरांची भूमिका महत्त्वाची असते. 'ब्ल्यू मॉरमॉन' हे फुलपाखरू श्रीलंका व भारतातील केवळ महाराष्ट्र, दक्षिण भारत व पूर्व समुद्र किनारपट्टीच्या क्षेत्रात आढळते. सध्या विदर्भापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत त्याचे अस्तित्त्व आहे.

ब्ल्यू मॉरमॉन हे मखमली काळ्या रंगाचे फुलपाखरू आहे. पंखांवर निळ्या रंगांच्या चमकदार खुणा, पंखाच्या खालची बाजू काळी, शरीराकडील एका बाजूवर लाल ठिपका असतो.

# विंडो बर्डिंग, अर्थात् खिडकीतून दिसणारे पक्षी

चेंबूरमध्ये हिरव्यागच्च झाडीत वसलेली राष्ट्रीय केमिकल्स व फर्टिलायझर्स RCF ची सुंदर वसाहत आहे. एके दिवशी शेखरने म्हणजे आमच्या ह्यांनी RCF ची नोकरी सोडली व तिथले घर आम्हास सोडावे लागले. तसाच सुंदर परिसर आम्हाला ठाण्यातील घोडबंदर रोड जवळील ब्रह्मांड वसाहतीत मिळाला व आम्ही इथे 'मायग्रेट' झालो.

ब्रह्मांड हीसुद्धा मोठी आणि सुंदर वसाहत आहे. घोडबंदर रोड वरून आत शिरताच इथला स्वच्छ गारवा मनाला उल्हसित करतो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंची आंब्याची झाडे आपले स्वागत करतात. पुढे पुढे जाऊ तसे हिरव्यागार निसर्गामुळे आपले भान हरपून जाते. ब्रह्मांड फेज १ ते ८ अशी रचना असलेल्या या संकुलास गच्च रानाची सुंदर किनारही लाभली आहे. आमची फेज ८ म्हणजे ब्रह्मांडाचे शेवटचे टोक. इथेमात्र हे रान मस्त छोट्याशा जंगलाच्या रूपात आमच्या फेजला खेटून उभे असल्याप्रमाणेच भासू लागते. या धाकट्या रानाचे नशीब थोर की, प्रत्यक्ष संरक्षण विभागाचे संरक्षण त्यास लाभले आहे. एका बाजूला संजय गांधी नॅशनल पार्कचे थोरले जंगल, तर दुसऱ्या बाजूला उल्हास नदीची खाडी. यामध्ये निसर्गरम्य ठिकाणी आहे आमचं घर. घरासमोरच काटेसावर, सोनमोहर, गुलमोहर, पळस, पांगारा अशी फुलोऱ्याची झाडे आहेत.



आमच्या घरातून हा निसर्ग खूपच सुंदर दिसतो. पूर्वाभिमुख इमारत असल्यामुळे सूर्यनारायण उगवताना आकाशातील वेगवेगळ्या रंगांची ऋतुमानाप्रमाणे झालेली उधळण मंत्रमुग्ध करते. पहाटेपासून पक्ष्यांच्या किलबिलीने जागं झालेलं जंगल उगवत्या सूर्यप्रकाशानं उजळून निघतं. निसर्गाचं हे लोभस रूप, पक्ष्यांच्या सहवासामुळे मन उल्हसित करतं आणि दिवस आनंदाने सुरू होतो.

एवढा सुंदर निसर्ग घरातून दिसतोय म्हटल्यावर तो निसर्ग टिपण्यासाठी शेखरने मुलांसाठी साधा डिजिटल कॅमेरा आणला. मग तो कॅमेरा कसा वापरावा, तो कसे काम करतो, हे वडील मुलांना सांगत होते. मुलं मन लावून ऐकत होती. मुलांबरोबर माझ्या कानावरसुद्धा हा अभ्यास पडत होता. त्यांनी काढलेले फोटो कसे आलेत, त्यावर बाबांनी केलेले परीक्षण मी मनापासून एंजॉय करीत होते. तेव्हा माझी मुलगी म्हणाली, ''आई तू पण बघ ना फोटो काढून, तुला पण जमेल.'' तेव्हा शेखर आणि माझा मुलगा उत्सुकतेने माझ्याकडे बघत होते. चला सर्वांनाच वाटतंय तर प्रयत्न तरी करून बघू, असे म्हणून त्यांच्याबरोबर खिडकीत येऊन बसले. कॅमेऱ्यातून नक्की कसला फोटो घ्यायचा म्हणून, समोरील जंगलाकडे मी प्रथमच नीट काळजीपूर्वक पाहू लागले. वसंत ऋतू असल्यामुळे गुलाबी फुलांनी फुललेल्या काटेसावरीकडे माझे लक्ष गेले. तिथे एका फांदीवर काळ्या रंगाचा कोतवाल (ड्रोंगो) हा पक्षी बसला होता. कॅमेराच्या डोळ्यातून काटेसावरीची गुलाबी फुले आणि काळा ड्रोंगो फारच सुंदर दिसत होता. मी कॅमेराचे बटन दाबले, तेवढीच माहिती त्यावेळी मला होती. फोटो काय आला आहे, हे मी व मुले उत्सुकतेने पाहू लागलो. गुलाबी फुलांनी बहरलेली काटेसावर दिमाखात फोटोमध्ये उभी होती. पण कोतवालसाहेब मात्र फोटोतून गायब झाले होते. अरेच्च्या! हे असे कसे काय झाले, म्हणत काटेसावरीकडे पाहिले तर कोतवालसाहेब मजेत तिथेच बसले होते. हवेत उंच सूर मारत उडता-उडता किडा टिपून पुन्हा ते त्याच फांदीवर येऊन बसले होते. म्हणजेच, मी कॅमेराचे बटन दाबायला, कोतवाल साहेबांनी हवेत झेप घ्यायला एकच वेळ साधली होती. आता मात्र थोडा वेळ त्यांच्या उड्या मारण्याच्या प्रकारावर लक्ष केंद्रित करून, थोडा वेळ त्याचा अंदाज घेत कॅमेराचे बटन पुन्हा दाबले. आता मात्र कोतवाल साहेबांनी हवेत झेप घेतानाचा 'रामभरोसे' फोटो मला मिळाला. अशा प्रकारे त्यादिवशी माझ्या पक्ष्यांच्या फोटोग्राफीचा श्रीगणेशा झाला. शेखर व मुले आपआपल्या उद्योगाला गेली की, घरच्या खिडकीत बसून समोरील झाडे व पक्ष्यांबरोबर माझी फोटोग्राफी सुरू व्हायची, फोटोग्राफीच्या निमित्ताने वेगवेगळे पक्षी दिसायलाही लागले.

एके दिवशी पावसाळ्यात खाली रस्त्यावर चिमण्यांचा फारच गोंधळ चालला होता. सहज बघितले तर पांढऱ्या कानाचा बुलबुल तिथे पडलेले केळं खात होता, तो इथे नवीन पाहुणा असावा म्हणून चिमण्या गोंधळ करत होत्या. मग मी घरातील केळे खिडकीत आणून ठेवले. बघू, झाडावर आला तर त्याला दिसेल, आला तर आला! मनापासून केलेली इच्छा फळते असे म्हणतात. तर खरेच हा पठ्ठ्या समोरच्या सोनमोहरावरून केळं खायला खिडकीत हजर! भुकेमुळेच त्याने एवढे धाडस केले असावे. तेव्हापासून पावसाळ्यापर्यंत हा नियमित केळं खायला येत होता. त्याच्या पिवळ्या बुडामुळे आम्ही त्याचे नाव 'पिवळ्या' ठेवले. त्याने या मेजवानीची बातमी इतर जातभाईंना दिली असावी. मग लालबुड्या बुलबुल, शिपायी बुलबुलसुद्धा केळं खायला यायला लागले. त्यांना आम्ही 'काळ्या' व 'लाल्या' म्हणू लागलो. २०१३ साल माझ्यासाठी असे लकी ठरले. एक चांगला छंद जोपासता आला.

कावळा, चिमणी, कबुतर, साळुंखी जास्तीत-जास्त पोपट एवढीच पक्ष्यांबद्दल माहिती असणारी मी आता मात्र फक्त घराच्या एका खिडकीतून साठ प्रकारचे तरी पक्षी पहिले आहेत. तसेच, चाळीस प्रकारच्या पक्ष्यांचे

पान ५ वर...

पान ४ वरून...

फोटो, त्यांच्या चलचित्र फितींचा वाढतच जाणारा ठेवा सांभाळून आहे. यामध्ये नियमित दिसणारे लालबुड्या बुलबुल, शिपाई बुलबुल ऋतुमानाप्रमाणे दिसणारे पांढऱ्या गालाचा बुलबुल, ताम्रहंस, दुर्मिळ होत चाललेली जांभळी पाणकोंबडी, क्रेक असे हे बरेच पक्षी या जंगलात पहायला मिळतात. निसर्ग, प्राणी, पक्षी यांची आवड असल्यामुळे सतीश पांडे यांचे 'दि बर्डस ऑफ वेस्टर्न घाट' तर सालीम अली यांचे 'दि बुक ऑफ इंडियन बर्डस' अशी पुस्तके घरात होतीच, तरीसुद्धा विस्तारित माहिती मिळावी म्हणून ग्रिमीट यांचे 'बर्डस ऑफ दि इंडियन सबकॉन्टीनंट' हे पुस्तकही शेखरने आणले. त्यामुळे नवीन पक्षी मिळाला की, त्याची माहिती करून घ्यायला सोपे जाते. एवढे पक्षी आपल्या परिसरात दिसतात, ही माहिती मैत्रिणींमध्ये शेयर करावी म्हणून तीस प्रकारच्या पक्ष्यांच्या फोटोंच्या प्रिंट काढल्या. ब्रह्मांडमध्ये 'मायबोली' नावाचा आमचा एक ग्रुप आहे. तिथे मराठी साहित्यावर कार्यक्रम होत असतात. तिथल्या माझ्या मैत्रिणींना ते फोटो दाखवले. त्यांना हे खरेच वाटेना की, आपल्याकडे एवढे पक्षी दिसतात व हे फोटो मी काढलेत ते! एका मैत्रिणीने ब्रह्मांडमध्येच, त्यांच्या सोसायटीत २६ जानेवारीला या फोटोंचे प्रदर्शन लावण्यास सांगितले. लहान-थोर सर्वांमध्येच आपल्या सभोवतालाबद्दल जागृती निर्माण करण्याची ही नामी संधी होती. ते पक्ष्यांबद्दलचे माझे पहिले प्रदर्शन! सर्व फोटो एका खिडकीतूनच काढले म्हणून त्याचे नाव दिले 'विंडो बर्डींग'. प्रदर्शन बघायला येणाऱ्यांमध्ये पहिले आश्चर्य हे होते की, घरात बसून एवढे पक्षी पहायला मिळतात ! आपल्या परिसरात एवढे पक्षी आहेत, हे त्यांना माहितीच नव्हते !

याची चांगली दखल 'दी टाइम्स ऑफ इंडिया' ने घेतली. नंतर लगेचच 'विंडो बर्डींग' चा पहिला स्लाईड शो काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात 'ठाणे आर्ट गिल्ड' (टॅग) या संस्थेला दाखविण्याची संधी प्रसिद्ध चित्रकार विजयराव बोधनकर यांच्यामुळे मिळाली. ठाण्यातले बरेच सिने कलाकार, दिग्दर्शक, कवी, गायक, लेखक, चित्रकार यांनी एकत्र येऊन ही संस्था स्थापन केली आहे.

तर या पक्ष्यांसारखेच महत्त्व आहे ते काटेसावर, गुलमोहर, पांगारा आदी झाडांना. या झाडांचे आणि पक्ष्यांचे मस्त जमते! अशा झाडांसमोरच आमची खिडकी. मग काय मजाच. घरातली कामे उरकता उरकता अधूनमधून कॅमेराही डोळ्याला लावायचा. इकडे स्वयंपाकाची धांदल तर तिकडे पक्ष्यांची, इकडे फोडणी घाईवर आलेली असते, तर समोर झाडाच्या शेंड्यावर नेमका स्वर्गीय नर्तक बसलेला दिसतो. मग मसाल्याच्या डब्याशेजारी, कॅमेराही आता तयार असतो. सर्व आवरले की, दुपारी शांतपणे खिडकीत बसायचे, मग समोरच्या गवताळ भागात कधी गवई, चंडोल तर कधी पाणकोंबडी दिसते, तसेच पर्पल मुरहेन, तर कधी क्रेक असे दुर्मिळ होत चाललेले पक्षीही दिसत. मग त्यांचे चित्रीकरण करायचे.

घराच्या खिडकीत लाल्या, पिवळ्या, काळ्या या बुलबुलांसाठी केळं ठेवायला लागते. तर पोपटांसाठी पेरू, चिऊताईसाठी दाणे ठेवायला लागतात. हे पक्षी, अशा मेजवानीसाठी खिडकीत हमखास येऊन जातात. आता या पक्ष्यांचा आपल्या या खिडकीत काय गोंधळ चालला आहे, हे पहायला कोतवाल, शिक्रा, खाटीक, दयाळ, मुनिया हे पक्के जंगली पक्षी देखील आमच्या खिडकीच्या गजांवर बसून पाहून गेले. अगदी वटवाघूळही रात्रीचे येऊन केळे उचलून घेऊन जाते. खिडकीतल्या खाऊची बातमी परिसरातील सर्व पक्ष्यांना कळते. अशा प्रकारे समोरच्या जंगलानेच आपल्या या खिडकीत यायला सुरुवात केली आहे. या पक्ष्यांना जवळून पहाणे, हा वेगळाच आनंददायी अनुभव आहे. ब्रह्मांडाच्या या पक्ष्यांनी आमच्या घराशी नाते जोडले. सकाळच्या कोवळ्या किरणांबरोबर हे पक्षी मधुर स्वर घेऊन खिडकीशी येतात, दोन घास खातात आणि जंगलात निघून जातात. दिवसातून तीन-चार वेळा तरी ते बिनधास्त खिडकीत येतात. आता तर कुठे दोन दिवस बाहेर जायचे म्हटले तरी यांच्या खाण्यापिण्याची आम्हा सर्वांनाच काळजी वाटते.

या प्रतिमा कॅमेऱ्याच्या सेन्सरवर उतरवत असताना, या पक्ष्यांचे चलचित्रणही केले. मग या पक्ष्यांवर एक माहितीपटही तयार झाला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वसुंधरा फिल्म स्पर्धेमध्ये 'विंडो बर्डींग' हा माहितीपट पाठवून सहभागीही होता आले. 'विंडो बर्डींग'चे दुसरे प्रदर्शन ठाण्यातल्या कापूरबावडीमधील कलाभवन येथे २१, २२, २३ नोव्हेंबर २०१४ रोजी भरविले. या प्रदर्शनात फक्त एका खिडकीतून घेतलेल्या पन्नास पेक्षा जास्त पक्ष्यांची दोनशे छायाचित्रे सर्वांना पहायला मिळाली. कॅमेराच्या डोळ्यातून बघायचे आणि फोटो काढण्याचे बटन दाबायचे, एवढ्याच माहितीने छायाचित्रणाची सुरवात झाली, तो छोटा कॅमेरासुद्धा सुंदर फोटो देतो. हे सर्व फोटो त्या छोट्या कॅमेऱ्यानेच काढले. आता तर शेखरच्या DSLR कॅमेऱ्यांनाही गुपचूप हात लावलाय. त्यानेही, 'वापर' म्हणत त्यांच्याबद्दल थोडी थोडी माहिती देणे चालू केले आहे. छायाचित्रणावरील एक इंग्रजी पुस्तकही हल्ली वाचायला घेतले आहे. कारण चांगला मोठ्ठा DSLR कॅमेरा गळ्यात अडकवून, खिडकीच्या बाहेर झेप घेऊन रानातल्या त्या माझ्या पाखरांकडे कधी एकदा जाईन, असे झाले आहे.


सर्वात महत्त्वाचे हे की ५ जून या जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने, 'आपले पर्यावरण' या विषयावर जनजागृती होण्यासाठी, महाराष्ट्र शासन दरवर्षी माहितीपट निर्मितीची 'Vasundhara Short Film Festival on Environment' स्पर्धा घेते. या स्पर्धेत या वर्षी माझ्याच 'विंडो बर्डींग' या पक्ष्यांच्या माहितीपटाला प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले! पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम, पर्यावरण राज्य मंत्री श्री. पोटेपाटील, प्रदूषण मंडळाच्या सचिव श्रीमती मालिनी शंकर यांच्या हस्ते माहितीपटाला सन्मान मिळाला. यात सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, एक लाख रुपयांचा धनादेश देऊन माझे कौतुक केले. निसर्गाला आपण मूठभर दिले की तो आपल्याला सूपभर देतो, हेच खरे नाही का ?

**– सीमा राजेशिर्के**

*seemarajeshirke@gmail.com*

सीमा राजेशिर्के यांच्या यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन! – संपादक.

# वाईल्ड सीईआरने दिले इजिप्शियन गिधाडाला जीवदान, मध्यभारतातील पहिलीच नोंद



३ फेब्रुवारी २०१५ रोजी नागपूर शहरातील मानेवाडा येथे. श्री. मयुर शेवाडे ह्यांना एक पक्षी जखमी अवस्थेत आढळून आला होता. हा पक्षी इतका अशक्त होता की, स्वत:च्या पायावर उभा देखील राहू शकत नव्हता. त्यामुळे त्याला त्वरित वाईल्ड सीईआर संस्थेच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. वन विभागाला ह्या इजिप्शियन गिधाडाबद्दल माहिती देण्यात आली. पक्ष्यावर त्वरित उपचार करून त्याला औषधी देण्यात आली.

शारीरिक तपसाणी केली असता, ह्या गिधाडाचा डावा पंख मांजामुळे कापला गेला असल्याचे आढळून आले. त्याचे पंख, पंखाचा पडदा ह्यांच्यावर आतापर्यंत तीन शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून आता त्याची प्रकृती स्थिर झाली असल्याचे डॉ. बहार बाविस्कर ह्यांनी सांगितले. ह्या पक्ष्याच्या उपचारासाठी डॉ. उपाध्ये, डॉ. धकाते आणि डॉ. स्टिफन हार्श ह्या सगळ्यांचे मार्गदर्शन लाभल्यामुळेच यश आल्याचे डॉ. बाविस्कर ह्यांनी नमूद केले.

गिधाडाला पूर्ण बरे होण्यासाठी आणखी दोन ते तीन महिने लागणार आहेत. अशा प्रकारे इजिप्शियन गिधाडाला जीवदान देण्याची मध्य भारतातील ही पहिलीच नोंद असून २०१४ मध्ये वाईल्ड सीईआर संस्थेतर्फे ३०० पेक्षा अधिक पक्ष्यांवर वैद्यकीय उपचार केले असल्याचे सांगितले.

नागपूर परिसरात आपल्याला जखमी पशू वा पक्षी सापडल्यास संस्थेच्या ९५६१४०४१७४/ ८९७५७३७९९१ किंवा ८२३७६०४१८८ ह्या क्रमांकावर कळविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**– वाईल्ड सीईआर.**

---

**स्वागत –**

## खगायन

२७ व्या पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अनिल पिंपळापुरे यांच्या ‘खगायन’ या पुस्तकाचे प्रकाशन २८ व्या संमेलनात झाले. ‘पक्षीमित्र’ प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या या पुस्तकात डॉक्टरांनी लिहिलेल्या ४९ लेखांचा संग्रह आहे. नागपूरच्या दै.तरुणभारतमध्ये सप्ताहिक सदरातून ते प्रसिद्ध होत होते.

आपल्या सभोवार दिसणाऱ्या पक्ष्यांचा परिचय करून देत असतानाच वाचकांमध्ये पक्षीप्रेम निर्माण व्हावे, त्यांनी निसर्गप्रेमी व्हावे, ही त्यांची इच्छा काही अंशी सफल झालेली आहे. नागपूर शहरात बऱ्याच संख्येने पक्षीनिरीक्षक निर्माण झालेले आहेत. सूर्योदयानंतरचे दोन तास व सूर्यास्ताच्या आधीचे दोन तास हे पक्षी निरीक्षणासाठी उत्तम असल्याचे त्यांचे निदान अचूक आहे.

सहा दिवस झपाटून काम केल्यानंतर येणारा रविवार रूढार्थाच्या विश्रांतीत न घालवता ते पक्षीनिरीक्षण, पक्षीअभ्यास यात ‘विश्रांती’ शोधत, हे त्यांच्या लेखनातून जाणवले. इतरत्र फारसा न आढळणारा ओरिएंटल हनी बझर्ड या पक्ष्याला त्यांनी नागपूरचे मानचिन्ह करून टाकले आहे. यात त्यांची गुणग्राहकताच दिसते. राज्य पक्ष्याप्रमाणे नगरपक्षी का नसावा ?

केवळ पक्षीपरिचय करून देण्यातच न थांबता त्यांनी डॉ.सालिम अली, जॉन जेम्स ऑडुबन यांचा यथार्थ गौरव केला आहे. सर्वात थरारक भाग आहे तो जेडॉर्नच्या कोर्सरचा शोध घेण्याच्या प्रयत्नांचा. आंध्रात तो दुर्मिळ पक्षी अनेक वर्षांनी शोधला गेला. तो गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात असण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांनी जिद्दीच्या सहकाऱ्यांसोबत तीन दिवस प्रयत्न केले. हा भाग नक्षल्यांच्या प्रभावाचा. त्यांच्याकडून केव्हाही हल्ल्याची शक्यता. पण त्याला न भिता त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या धैर्याला सलाम! तो सापडला असता तर त्यांच्या प्रयत्नांचे चीज झाले असते.

प्रकाशक : पक्षीमित्र प्रकाशन, नागपूर

पृष्ठे : २००, किंमत ₹ ३००/–

**– दिगंबर गाडगीळ**

# वरुड येथील १५ वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन

विदर्भामध्ये विभागीय स्तरावरील पक्षीमित्र संमेलनांची परंपरा स्व.रमेश लाडखेडकर सरांच्या पुढकारातून सातत्याने चालत आली आहे. ही परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी डॉ. अनिल पिंपळापुरे, श्री. कौस्तुभ पंढरीपांडे, श्री. राजकमल जोब, डॉ. जयंत वडतकर, डॉ. गजानन वाघ व इतर अनेक पक्षीमित्र प्रयत्न करीत असतात. यावर्षी १५ वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन अमरावती जिल्ह्यातील वरुड येथे दि. २८ फेब्रुवारी ते १ मार्च २०१५ यादरम्यान पार पडले. सदर संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी वरुड येथील नेचर फाउंडेशन यांनी घेतली होती.

वरुड येथील नेचर फाउंडेशन, महात्मा फुले महाविद्यालय, जायंटस ग्रुप, पहाटपक्षी मित्रमंडळ, वनपरीक्षेत्र कार्यालय, वरुड व मोर्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले. १५ वे विदर्भ पक्षीमित्र संमेलन श्री कपिलेश्वर मंदिर, गव्हाणकुंड येथे डॉ.मनोहर खोडे, ज्येष्ठ पक्षी अभ्यासक, वरुड, यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या संमेलनाला उद्घाटक म्हणून नागपूर येथील ज्येष्ठ पक्षी अभ्यासक श्री.गोपाळराव ठोसर उपस्थित होते. संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अनिल पिंपळापुरे, नागपूर, महाराष्ट्र पक्षीमित्रचे प्रतिनिधी डॉ.जयंत वडतकर, प्राचार्य डॉ.डी.व्ही.अतकरे, के. डी. वैद्य, निळकंठ यावलकर, डॉ.मनोहर आंडे, संजय सातपुते, आदी उपस्थित होते. संमेलनामध्ये अमरावती, वर्धा, अकोला, वाशीम, नागपूर येथील एकूण शंभर पक्षीमित्रांनी सहभाग घेऊन ‘पक्षी अधिवास : संवर्धन व संशोधन’ यावर चर्चा, तसेच विविध विषयांवर आपली सादरीकरणे केली. प्रमुख सादरीकरणांमध्ये डॉ. गजानन वाघ यांनी अमरावती जिल्ह्यामधील पक्षी अधिवास व त्यांचे धोके, डॉ. अनिल पिंपळापुरे यांनी विदर्भातील विविध पक्षी अधिवास व त्यातील पक्षी जीवन, डॉ. बहार बाविस्कर यांनी पक्ष्यांचे उपचार, किरण मोरे यांनी विदर्भातील ‘वेक्स’ ने घेतलेल्या नवीन पक्ष्यांच्या नोंदी, कु. वैष्णवी रिठे हिने रॉबिन पक्ष्याचा अभ्यास आदी विषयांवर सादरीकरणे केली. दुसऱ्या दिवशीच्या सत्रांमध्ये डॉ. जयंत वडतकर यांनी पक्ष्यांचा अभ्यास व नोंदींचे महत्त्व तसेच online website, eBird, IBCN इत्यादींविषयी माहिती दिली. डॉ.संजय सातपुते यांनी पक्षी व वनस्पती सहसंबंध या विषयावर सादरीकरण केले. याशिवाय बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई. येथील नंदकिशोर दुधे यांनी त्या संस्थेद्वारा राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच जास्तीत जास्त लोकांनी या संस्थेचे सदस्य व्हावे, असे आवाहन केले. दुसऱ्या दिवशी सकाळी पक्षीमित्रांनी शेखदरी धरण येथे पक्षी व वन्यजीव निरीक्षण केले.

संमेलनात सहभागी सर्वांनी समोरोपीय कार्यक्रमात ‘महेंद्रीचे जंगल संरक्षित व्हावे व त्याला अभयारण्याचा दर्जा मिळावा’ असा प्रस्ताव एकमताने पारित केला. पुढच्या वर्षी संमेलन वाशिम येथे घेण्यात येईल असे ठरविले. संमेलनाच्या आयोजनासाठी डॉ. आशिष चौधरी, वसंत फुटाणे, डॉ. गजानन वाघ, डॉ. बहार बाविस्कर, अंबादास अकोटकर, घन:श्याम खेरडे, अनिल जावळे तसेच श्री. निंभोरकर, वनपरीक्षेत्र अधिकारी, वरुड व श्री. अशोक कविटकर, वनपरीक्षेत्र अधिकारी, मोर्शी इत्यादींचे मार्गदर्शन लाभले.

या संमेलनाच्या आयोजनाकरिता वरुड येथील पक्षीमित्र रामभाऊजी राऊत, प्रभाकरराव काळे, विलास देवते, आशिष चौधरी, रवी मालवे, तसेच श्री कपिलेश्वर मंदिर संस्थानचे सचिव श्री.अशोकराव पाटील व वरुड येथील जागृत कनिष्ठ महाविद्यालयाने मोलाचे सहकार्य केले.

**– डॉ. जयंत वडतकर**

## २९ वे महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संमेलन

**सावंतवाडी**

**निसर्ग प्रेमी – मंडळ व वाईल्ड कोकण**

यांच्या संयुक्त विद्यमाने

**कालावधी २३ व २४ जानेवारी २०१६**

**संपर्क**

डॉ. गणेश मर्गज
भ्र. ०९४२०२०९०१३
३/६, २३/अ, विवेकानंद हौसिंग सोसायटीसमोर,
गार्डन सालीवाड्याच्यामागे, सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग

श्री.सुभाष गोवेकर
भ्र.९४२११४८५२२
४-गोकुळ, नवजीवन सोसायटी, गरड,
सावतंवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग – ४१६ ५१०

वरील तारखेप्रमाणे आपापली आरक्षणे करा. प्रत्यक्ष नोंदणी फॉर्म, संमेलन शुल्क इत्यादींबाबत लवकरच कळविण्यात येईल.

# पक्ष्यांची सेवा - एक उत्तम सेवा

हल्ली आपण नेहमी वाचतो की, अमूक अमूक पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. आणि असेच होत राहिले तर आपल्याला पक्ष्यांची ओळख पुस्तकातूनच करावी लागेल. हे पक्षी म्हणजे निसर्गाची सुंदरता आहेत आणि ती आपल्याला देवाने भेटच दिली आहे. हे पक्षी आपल्याला आनंद देतात, आपले मनोरंजन करतात, आपल्या ज्ञानात भर घालतात. निसर्गाची सुंदरता आपल्या दारी आणायची असेल तर घराभोवती झाडे लावली पाहिजेत आणि त्या झाडांजवळ पक्ष्यांना खाण्यासाठी व पिण्याची सोय केल्यास अनेक पक्षी आपल्या घरी येतील. असेच एक सत्कार्य मंत्रीचंडक नगर, रूपाभवानी मंदिराजवळील रहिवासी अनिल भगिरथ जोशी हे गेल्या पाच वर्षांपासून करत आहेत. पक्ष्यांसाठी त्यांनी खाण्याची व पाणी पिण्याची सोय करून समाजाला एक नवी दिशा दाखवली आहे.



उन्हाळ्यामध्ये अनेक पक्षी पाण्याअभावी मरतात. माणसाला तहान लागली तर तो स्वत:ची सोय करू शकतो. परंतु पशु-पक्ष्यांनी काय करावे ? त्यांच्या घश्याची कोरड घालविणे हे आपले कर्तव्य आहे, असे अनिल जोशींना वाटते. त्यामुळेच जोशींनी घराभोवती असलेल्या जागेत वेगवेगळी फळांची, फुलांची झाडे लावलेली आहेत. त्यामध्ये आंबा, चिकू, बदाम, आवळा, जाई-जुई, जास्वंद, पारिजात, अंजीर, मनीप्लान्ट इत्यादी झाडे आहेत. या बागेमध्ये ठिकठिकाणी वेगवेगळ्या झाडांना मातीचे बाऊल लटकविण्यात आले आहेत. तसेच प्लास्टिकचे बाऊलही लटकविण्यात आले आहेत. यातूनच पक्ष्यांना पाण्याची सोय करून देण्यात आलेली आहे. तसेच पक्ष्यांचा खाऊ ठेवण्यासाठी 'लाकडी ट्रे' तयार करून ते झाडांना टांगलेले आहेत. त्या लाकडी ट्रेमध्ये चपाती, गहू, तांदूळ, ज्वारीचे दाणे, भात इत्यादी पक्ष्यांसाठी ठेवले जाते. त्यामुळे अनेक पक्षी येतात. तसेच पक्ष्यांना राहण्यासाठी छोटी घरटीही तयार करण्यात आलेली आहेत. एकंदरीतच पक्ष्यांसाठी अन्न, पाणी, निवारा यांची सोय अनिल जोशी यांच्या घरात होते. पक्ष्यांना स्वच्छ पाणी मिळावे, म्हणून रोज सर्व बाऊलमधील पाणी बदलण्यात येते. पोपटांना त्यांचे आवडते कणीससुद्धा श्री. जोशी ठेवतात. त्यामुळे पोपट, खार यांचा वावर नेहमी असतो. शिवाय भारद्वाज, चिमणी, कावळा, कोकिळा, बुलबुल, सनबर्ड इत्यादींचा वावर सारखाच असतो. पहाटे साडेपाच वाजल्यापासून या पक्ष्यांची किलबिल सुरू असते. अनेकवेळा चिमणी वगैरे पाण्याच्या बाऊलमध्ये अंघोळ केल्यासारखे करतात. त्यांचे पंख भिजवून, पाणी उडवत असतात, तो क्षण पाहण्यासारखा असतो. मुलेसुद्धा हा क्षण टिपण्यासाठी कॅमेरा हातात घेऊन धावपळ करतात. अनिल जोशी यांच्या कार्याला आई-वडिल, पत्नी, मुले यांची नेहमीच साथ असते. मुले बाऊलमधील पाणी संपत येताच पुन्हा पाण्याने भरून टाकतात. पक्ष्यांसाठी खाऊ ठेवतात. आपणही आपल्या घरी अशी सोय केल्यास अनेक पक्ष्यांना आहार मिळेल.

**- इंजि. अनिल जोशी, सोलापूर**

*मो. ९८२२२८५७०७, e-mail : anilbjoshi@gmail.com*

## पक्षीमित्रांना आवाहन

आपली पक्षीनिरीक्षणे, पक्षीअभ्यास प्रकल्प, पक्ष्यांचे प्रथम दर्शन, शास्त्रीय पेपर इत्यादी पाठवावे. पक्षीमित्रमध्ये प्रसिद्ध केले जाईल. लिखाण हाती लिहून, टाईप करून ई-मेलने pakshimitra@gmail.com वर अथवा पोस्टाने महाराष्ट्र पक्षीमित्र, ११, युनायटेड पार्क, मार्कंडी, चिपळूण या किंवा संपादकांच्या पत्त्यावर पाठवावे.

## अभिनंदन!

आपले एक सभासद डॉ. प्रमोद पाटील जे, बॉंबे नॅचरल हिस्ट्री' सोसायटीत अधिकारी आहेत. त्यांना या वर्षीचा मानाचा 'व्हिटले' पुरस्कार मिळाला आहे. राजस्थानामध्ये माळढोक संवर्धनावर ते काम करीत आहेत. कार्यपालिका आणि गावकरी यांच्या समन्वयाचे काम ते करतात. या जोड प्रयत्नातून माळढोक, जो दुर्मिळ होण्याच्या वाटेवर आहे, संवर्धन होऊ शकेल असे ते मानतात.

गेल्या वर्षी त्यांना 'सॅक्चुअरी' द्वैमासिकातर्फे 'वाइल्डलाइफ सर्व्हिस' पुरस्कार त्याच कामा संदर्भात मिळाला होता.

'पक्षीमित्र' तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !!

# न्यूजलेटर फॉर बर्डवॉचर्स

बंगळुरू येथून प्रकाशित होणारी 'न्यूजलेटर फॉर बर्डवॉचर्स' ही द्वैमासिक पत्रिका केवळ पक्षीशास्त्राला वाहून घेतलेली विज्ञान पत्रिका आहे. १९६० साली ही पत्रिका सुरू करण्यात आली होती. ह्याचे सर्व अंक पक्ष्यांसंबंधीच्या नवीन महितीने ठासून भरलेले असतात आणि संग्राह्य असतात.

अर्धशतकाहून अधिक कालावधीत भारतातील पक्ष्यांसंबंधी हजारो लेख तसेच निरीक्षणे ह्या पत्रिकेत प्रकाशित झाली आहेत. भारतातील सर्व नामवंत पक्षीतज्ज्ञ तसेच हौशी पक्षीमित्र ह्या पत्रिकेत आपल्या नोंदी, निरीक्षणे तसेच संशोधन पत्रे (रिचर्स पेपर) प्रकाशित करीत असतात. विशेष म्हणजे ह्या पत्रिकेत साध्या-सोप्या इंग्रजी भाषेतील निरीक्षणेसुद्धा प्रकाशित केली जातात. पत्रिकेचे बहुतेक जुने अंक आता इंटरनेटवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळे आपल्याला पूर्वसुरी पक्षीमित्रांनी घेतलेल्या महत्त्वपूर्ण नोंदींचा खजिना अभ्यासासाठी खुला झाला आहे. (http://sites.google.com/site/nlbw2011)

गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रातील नामवंत पक्षीतज्ज्ञ श्री.बी.एस.कुलकर्णी ह्या पत्रिकेच्या संपादक मंडळावर आहेत. २०१३ पासून माझीसुद्धा संपादक मंडळावर नेमणूक करण्यात आली आहे. महाराष्ट्रातून लेख लिहिणाऱ्या नामवंत शास्त्रज्ञांमध्ये पै. सालीम अली, हुमायून अब्दुल अली, डॉ. असद रहमानी, डॉ. सतीश पांडे, डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, निरंजन संत, भाऊ काटदरे, किरण पुरंदरे, डॉ. अनिल पिंपळापुरे अशी कितीतरी नावे घेता येतील. नवीन पक्षीमित्रांमध्ये रोहन लोवलेकर, सचिन पालकर, विश्वास जोशी, डॉ. जयंत वडतकर, डॉ. गजानन वाघ पासून अमोल लोपेस, अशहर खान असे अनेक जण आपापल्या महत्त्वपूर्ण नोंदी, निरीक्षणे प्रकाशित करीत असतात. आजतागायत माझी स्वत:ची ५० पेक्षा अधिक निरीक्षणे, लेख व संशोधन पत्रे न्यूजलेटर फॉर बर्डवॉचर्स मध्ये प्रकाशित झाली आहेत.

पत्रिकेचे प्रकाशक श्री.एस.श्रीधर हे असून वार्षिक वर्गणी केवळ ₹२००/- त्रैमासिक वर्गणी केवळ ₹ ५००/- आहे. चेक अथवा डिमांड ड्राफ्ट 'न्यूजलेटर फॉर बर्डवॉचर्स' ह्या नावाने आपले नाव, संपूर्ण पत्ता (जेथे पत्रिका हवी आहे), दूरध्वनी क्रमांक, इ-मेल, जन्म तारीख तसेच तुमचा परिचय कुणी करून दिला (ह्या पत्रिकेसंबंधी माहिती कुणी दिली) त्याचे नाव आणि स्वाक्षरी एवढ्या गोष्टी सुवाच्च अक्षरात इंग्रजीत लिहून पाठवाव्यात.

**- डॉ. राजू कसंबे**

संपर्कासाठी पत्ता -
Newsletter for Birdwatchers
No.10,Sirur Park B Street, Seshadripuram,
Bangalore-560020, Karnataka
Tel.080-23561142 / 23464682, e-mail: nlbw.india@gmail.com

### महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजच

# सभासद व्हा !

एकदाच ₹ ५००/- भरा व आजीवन सभासदत्व मिळवा. आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

### सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी. / मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे चिपळूण येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.

बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, चिपळूण शाखा.

खात्याचे नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र. बँक खाते नं.: ६००३६८१२०१७

खात्यात पैसे भरून त्वरित मेलने कळवणे, तसेच सभासदत्व अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे. सोबत पे-इन-स्लीपची झेरॉक्स जोडावी.

# महाराष्ट्रातील १०० सामान्य पक्षी

## एक ई पुस्तक

आपले कार्याध्यक्ष डॉ. राजू कसंबे यांनी वरील 'ई' पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यात महाराष्ट्रात आढळणाऱ्या १०० पक्षी प्रजातींचे वर्णन, सोबत त्यांची रंगीत प्रकाशनचित्रे आहेत. खालील वेबसाइटवर ते नि:शुल्क डाऊनलोड करून घेताही येईल.

http;//nagpurbirds.org/E-Book_100_commm_Birds_in_maharashtra_MarathiPDF

### उपक्रम

# नाशिक नेचर ट्रेल

आपले एक सभासद वैद्य विक्रांत जाधव यांनी नाशिकच्या लायन्स क्लबच्या सहयोगाने नेचर ट्रेलचा उपक्रम सुरू केला आहे. त्याच्या उद्घटनासाठी ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. अल्मीडा आले होते. रविवारी २-३ किलोमीटर परिसरात हिंडून तेथील वनस्पतींची ओळख करून देण्याचा हा कार्यक्रम असेल. जोडीला तिथे आढळणारे पक्षी, कीटक यांचाही परिचय करून दिला जाईल.

# जन्मकथा नीलपरीची

पृथ्वीतलावर प्रत्येक प्राणी-पक्ष्याला घराची आवश्यकता असतेच. हे घरटे तयार करण्याची ज्याची-त्याची एक शैली असते. मला निसर्ग निरीक्षणाची आवड असल्याने जंगलातील ठरलेल्या ठिकाणांना किमान दोन-तीन वेळा तरी भेटी देत असतो.

सन २०१४ चा पावसाळा पक्षी निरीक्षणात मला सर्वोच्च आनंद मिळवून देणारा ठरला. या पावसाळ्यात मला नीलपरी या सुंदर पक्ष्याचा छोटासा जीवनक्रम निरीक्षण्याची संधी मिळाली.

शहरापासून लांब असलेल्या खेडेगावात माझी शाळा. तेथे मी शिक्षक. दररोज बऱ्यापैकी जंगल असलेल्या रस्त्याने आमचा प्रवास. टू-व्हिलर वरून जाताना मी मागे बसून जेवढे जास्तीत-जास्त निरीक्षण करता येईल, तेवढे करीत असतो.

१० जून २०१४ रोजी एका वाळलेल्या काडीवर मी एक पक्षी बघितला. नंतरचे दोन दिवसही तो तेथेच दिसला. त्यानंतर थांबून निरीक्षण केले असता तो घरटे बांधीत असल्याचे लक्षात आले. जवळपास २२ जूनपर्यंत त्याचे घरटे बांधण्याचे काम पूर्ण झाले. २४ जून अखरेपर्यंत घरट्यात अंडी नव्हती. मात्र २८ जूनला हात उंच करून घरट्याच्या आतील भागाचा फोटो घेऊन निरीक्षण केले असता तीन अंडी आढळून आली. त्यांचा आकार साधारण गोटीसारखा, एका बाजूला थोडा निमुळता व त्याच्या पांढऱ्या रंगावर काही पिवळसर-राखाडी ठिपके होते. अंडी निर्जीव दिसत असली तरी ती तजेलदार होती व त्या तीन अंड्यांमध्ये तीन जीव दडलेले होते. ही अंडी एखाद्या शत्रूच्या भक्ष्यस्थानी पडणार की, त्यातून पिले बाहेर पडतात? त्या पिलांचे भविष्य काय? या प्रश्नांची उत्तरे मला पुढील काही दिवसांनी मिळणार होती.



पावसाळा लांबल्यामुळे तो १५ जून २०१४ पासून सुरू झाला. पावसाने जोरदारपणे सुरुवात केली होती. मादी सकाळ-संध्याकाळ अंड्यांवर बसलेली असायची. उत्सुकता जास्त ताणल्यामुळे ५ जुलै २०१४ रोजी घरट्याजवळ गेलो. माझे व घरट्याचे अंतर फक्त एका हाताएवढे होते. तरीही मादी उडून गेली नाही. अंडी उबविणे शेवटच्या टप्प्यात असावे, म्हणून ती स्तब्ध बसून होती.

दि.१० जुलै २०१४ रोजी मादी घरट्याच्या काठावर बसलेली दिसली. घरट्याजवळ गेलो असता ती जवळच्या फांदीवर जाऊन बसली. घरट्याजवळ गेल्यावर पिलांचा अगदीच लहानसा आवाज येत होता. फोटो काढून निरीक्षण केले असता तीन अगदीच नाजूक गोळे घरट्यात होते. दोन मिनिटांची शुटींग काढून त्यांचे निरीक्षण केले असता पिल्ले फारच जोराने श्वास घेत होती. त्यामुळे त्यांचे शरीर जास्तच हालत होते.



फोटो काढताना हालचाल जाणवल्यामुळे एका भुकेल्या पिलाला 'आईच खाणे घेऊन आली' असे वाटल्यामुळे त्याने थोडा आवाज करून लगेच 'आ' केले. मी दोन-तीन फोटो काढले व लगेच तेथून दूर झालो.

मी फोटो काढत असतानाच नर-मादी दोघेही जवळच्या फांदीवर येऊन बसले होते. मी दूर होताच त्यापैकी एक पक्षी पिलांजवळ आला. त्याने चोचीत आणलेले खाद्य पिलाच्या तोंडात टाकले व तो लगेच निघून गेला. दुसऱ्यानेही तसेच केले. मात्र तो आधी गेलेला पक्षी येईपर्यंत तेथून गेला नाही. यावरून माझ्या लक्षात आले की, ते पिल्लांना एकटे सोडत नाहीत.



आता पिलांच्या पंखांवर चमकदार काळी नाजुक पिसे दिसायला लागली होती. चोचींनाही चांगल्याप्रकारे आकार आलेला होता. त्यांनी डोळे मात्र अजून उघडले नव्हते. डोळ्यांच्या बंद भुवया राखाडी रंगाच्या दिसत होत्या. पाऊस लागू नये म्हणून मादी त्यांना पंखांखालीही घेत होती. त्यामुळे त्यांना ऊबसुद्धा मिळत होती.

१० जुलैला मोकळी जागा असलेले हे घरटे १५ तारखेला गच्च भरले होते. तिनही पिलांना राखाडी रंगाची पिसे आलेली होती. त्यांनी डोळेही उघडलेले होते. पुढचे काही दिवस काडी या पक्ष्यांचे वजन पेलणार का? याविषयी माझ्या मनात शंका निर्माण झाली.

१७ जुलै २०१४ रोजी, मी घरट्याजवळ जाऊ लागताच घरट्याच्या काठावर बसलेली दोन पिले उडून जवळच्याच फांदीवर जाऊन बसली. बहुदा त्यांनी दोन दिवसात उडण्याची तयारी केली असावी. थोडे कमजोर असलेले पिलू घरट्याच्या काठावर बसले होते. दुसऱ्या दिवशी तेही तेथे नव्हते.

दोन नीलपरी चे पाच नीलपरी झाले होते!

**श्री.दामू शंकर धादवड,** *मो. ९५२५२१८६१३*

## टपाल तिकिटांच्या दुनियेत –

# ब्लड फेजंट (Blood Pheasant (Ithaginis Cruentus))

हा पक्षी हिमालयाच्या पर्वतीय भागात सिक्कीम, नेपाळ, भूतान व म्यानमार येथे आढळतो. तो पर्वतीय भागातील गर्द झाडीत, बांबूचे वन अथवा काटेरी झुडुपांच्या भागात राहतो. तसेच बर्फाच्छादित प्रदेशात रहाणे पसंत करतो. हा पक्षी समूहात राहतो व जोराने पळतो. तो मोकळ्या जागेत विहार करतो व अन्न खातो. त्याची शिकार सहजपणे होते.

या पक्ष्याच्या चमकदार व काळ्या चेहऱ्याच्या वरील भागावर फिकट रेषा व पिवळा तुरा असतो व खालील भाग हिरव्या रंगाचा असतो व त्यावर पिवळ्या रेषा असतात. तसेच याच्या छातीचा वरील भाग, पंख शेपटीचा भाग गर्द रंगाचा असतो.

ब्लड फेजंट हा पक्षी भारताच्या सिक्कीम राज्याचा 'राज्य पक्षी' आहे.

भारतीय टपाल खात्याने १० मे १९९६ रोजी, ₹ ५ किंमतीचे टपाल तिकीट प्रकाशित केले आहे. नुकतेच २०१५ मध्ये कर्नाटक टपाल विभागातर्फे 'हिमालयातील पक्षी' या विषयावरील चित्रात्मक पोस्टकार्डाच्या संचात या पक्ष्यावर पोस्टकार्ड प्रकाशित केले आहे.





– रवींद्र वामनाचार्य, नाशिक

मो. ९८९०३९०५२७, *e-mail : r_wamanacharya@yahoo.co.in*


## स्वागत नव्या सभासदांचे

**२१ मे २०१५ ते २५ ऑगस्ट २०१५**

| क्र. | नाव | पत्ता | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| ८२३ | सौ. सीमा एस. राजेशिर्के | मुंबई | ०२२–२५८९८४०७ | seemarajeshirke@gmail.com |
| ८२४ | श्री. शिरीष विनायकराव गाजरलवार | नागपूर | ०७१२–२२९१४२० | shirish_2020@yahoo.in |
| ८२५ | श्री. सोपान तात्याराम भोंग | पुणे | ९९२१८१०५०५ | sopybhong@gmail.com |
| ८२६ | सौ. समजकुमार रणजितसिंग राजपूत | ठाणे | ०२२–२५४३५२०१ | samajrajput@gmail.com |
| ८२७ | श्री. रणजितसिंग गो. राजपूत | ठाणे | ०२२–२५४३५२०१ | dr.ranjitsmh@gmail.com |
| ८२८ | श्री. प्रदीप प्रभाकर दामले | सिंधुदुर्ग | ०२३६५–२४६६१३ | - |
| ८२९ | सौ. मीना अनिल भोळे | पुणे | ०२०–२५५१२७७९ | - |
| ८३० | मा. वंदना विजय खांडेकर | पुणे | ०२०–२५६७६४०२ | vandovijay@gmail.com |
| ८३१ | सौ. अस्मिता अनिल कुलकर्णी | पुणे | ०२०–२४३७३०४४ | akasmita5@gmail.com |

## त्रैमासिक निधी

**२१ मे २०१५ ते २५ ऑगस्ट २०१५**

| क्र. | नाव | पत्ता | रक्कम | दिनांक | पावती क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र भाजे | चंद्रपूर | ₹ ३००/– | १२ ऑगस्ट २०१५ | ६३८ |

## देणगी

| क्र. | नाव | पत्ता | रक्कम | दिनांक | पावती क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश राजेशिर्के | चिपळूण | ₹ १०००/– | १७ मे २०१५ | १३८६ |

## Indian Bird Conservation Network

The Indian Bird Conservation Network (IBCN) was established in 1998 by the BNHS in collaboration with BirdLife International and the Royal Society for the Protection of Birds (RSPB) - BirdLife partner in the UK. The IBCN is a network of organisations and individuals promoting the conservation of birds and their habitats in India and strengthening the biological diversity of the region.

**Objectives**

The IBCN promotes interest and takes action at a local, state and national level. The network monitors and safeguards IBAs through:

❖ Research & Monitoring ❖ Conservation Action
❖ Awareness & Education ❖ Policy & Advocacy
❖ Fund Raising ❖ Site Support Groups

**Present Scenario**

The IBCN is one of the leading membership networks in India, with about 100 organisational and 1000 individual members.

**Benefits of IBCN Membership**

- ❖ Provides a common platform for conservation of birds.
- ❖ Opportunity to bring conservation issues to the national audience.
- ❖ Opportunity to participate in network activities, surveys, research projects and workshops.
- ❖ A copy of the quarterly newsletter Mistnet to voice your opinion.

**Mistnet**

Contains articles and information on bird species (threatened and common), identified Important Bird Areas (IBAs) along with conservation issues, interventions and advocacy for the protection of biodiversity and their habitat.

**Join today**

**For more details contact:**

Indian Bird Conservation Network,
C/o BNHS, Hornbill House,
Opp. Lion Gate, S.B. Singh Road,
Mumbai 400 001, India
Email: ibabnhs@gmail.com, Website : www.ibcn.in
Tel: 022-22818957, 22821811, Fax: 022-22837615

### Form for Individual Membership of the IBCN

(Fill in BLOCK LETTERS)

1. Name ______________________
   (Mr/Mrs/Ms/Dr)
2. Date of Birth : Day ___ Month _________ Year _____
3. Address ______________________
   ______________________
   ______________________
   ______________________
   Dist ______________ Pin ________
   State______________________
4. Telephone/Mobile No. ______________
5. Email ______________________
6. Website ______________________
7. Organization/Position ______________
8. Academic qualifications ______________
9. Important Bird Areas which you visit ___________
   ______________________
10. Please list any other bird conservation organization that you are a member of : ______________
11. If proposed by IBCN member/state coordinator please mention Name ______________

Date ____________ Applicant Signature

Annual membership fee is ₹ 150/- for an Indian member and $15 for an overseas member payable through DD/Cheque/M.O./Bank Transfer in favour of **'BOMBAY NATURAL HISTORY SOCIETY'**. Outstation cheques should include additional ₹ 65/- towards bank charges.

**Kindly send the form to -**

Project Manager, IBCN, C/o BNHS, Hornbill House,
Opp. Lion Gate, S.B.Singh Road, Mumbai 400001, India.
**Email :** ibabnhs@gmail.com**, Website :** www.ibcn.in

## Form for Organization Membership of the IBCN

(Fill in BLOCK LETTERS)

1. Name of the organization ______________________

______________________

2. Address ______________________

______________________

______________________

______________________

3. Telephone ______________ Fax __________

4. Email ______________________

5. Date of Establishment ______________________

Registration No. ______________________

6. Aims & Objectives of the Organization ______________

______________________

7. Main Activities of organization, especially in bird conservation

______________________

8. Number of Members : ______________________

9. What is the management structure of the organization

(e.g. Council, Board of Trustees, Committees) __________

______________________

10. Who would be your nominated representative?

Name ______________________

Position ______________________

11. Important Bird Areas which you visit ______________

12. If proposed by IBCN member/state coordinator please mention Name ______________________

13. Please enclose the following : (a) Latest Annual Report, (b) Any other relevant information (e.g. Project Report, Information Leaflets, etc.)

Date ____________ Applicant Signature

Annual membership fee is ₹ 200/- for an Indian organization and $25 for an overseas organization payable through DD/Cheque/M.O./Bank Transfer in favour of **'BOMBAY NATURAL HISTORY SOCIETY'**. Outstation cheques should include additional ₹ 65/- towards bank charges.

**Kindly send the form to -**

Project Manager, IBCN, C/o BNHS, Hornbill House,
Opp. Lion Gate, S.B.Singh Road, Mumbai 400001, India.

**Email :** ibabnhs@gmail.com, **Website :** www.ibcn.in

## दुःखद निधन

पुणे येथील आपले एक सभासद श्री. जयंत बेंद्रे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले. ते ६३ वर्षांचे होते. त्यांची पाच पुस्तके प्रसिद्ध झाली होती. अलीकडचे श्री.मोहन जोशी यांच्या 'नटखट - नट-खट' या आत्मचरित्राचे शब्दांकन त्यांनी केले होते. रंगभूमी, मराठी चित्रपट, दूरदर्शन मालिकांमधून त्यांनी अभिनय केला होता.

ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो !

## वाचक कळवितात

जुलै १५ या 'पक्षीमित्र' अंक फार छान झाला आहे. थोडक्या पानात मजकुराची खूप निविधता आली आहे.

**- डॉ. अरुण जोशी, ठाणे**

जुलै १५ च्या अंकात परदेशीय (Exotic) पक्ष्यांबद्दल व्यक्त केलेला विचार स्पृहणीय आहे.

**-डॉ. टी.बी. निकम**

(e-mail)

## साभार पोच

आपले एक सभासद श्री.बाळासाहेब कुलकर्णी, अहमदनगर यांनी लिहिलेली दोन पुस्तके -

१) पर्यावरण

२) शून्य ते दहा - अर्थात अंकांचं महत्त्व

प्रकाशक - नीहारा प्रकाशन पुणे - ३०

किंमत - अनुक्रमे ₹ १२०/- ₹ ७०/-

## बंगाल तणमोरासाठी उपग्रह पाहणी

दुर्मिळ असलेल्या बंगाल तणमोराची हालचाल टिपण्यासाठी उपग्रहाची मदत घेण्याची तयारी बी.एन.एच.एस.ने केली आहे. उत्तर प्रदेश वनखात्याची संमती मिळाली आहे. आसाम वनखात्याची संमती येणे आहे. विणीच्या हंगामा व्यतिरीक्तची त्याची हालचालही नोंदली जाईल. बंगाल तणमोराच्या सर्वंकष संवर्धनाची तयारी त्यातून होईल.

या प्रकल्पासाठी भारतीय वन, पर्यावरण खात्याकडून आर्थिक तरतूद झालेली आहे.

## Financial support from IBCN

IBCN
Brings people for birds

BNHS
INDIA CONSERVING NATURE SINCE 1883

rspb giving nature a home

BirdLife
INTERNATIONAL

Please join Indian Bird Conservation Network (IBCN).
For details see website: www.ibcn.in



Registered with the Registrar of Newspaper in India under serial No. MAHMAR/2012/51349

**Book Packet containing periodicals**


प्रति,


प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी – ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org



**पक्षीमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : प्रिंटवेव, नाशिक
मुद्रक : एस्. व्ही. प्रेस – चिपळूण
फोन : (०२३५५) २५२३३०